# बोधवैभव

D.V.POTDAR
S P COLLEGE
D03104

3104

श्री

# बोधवैभव.

( बुधबावनी, बोधचौसष्टी, वैराग्यशतक ) वगैरे.

प्रकाशक

गो. का. चांदोरकर–धुळें

मुद्रक

शंकर श्रीकृष्ण देव

श्री आत्माराम छापखाना धुळें

कार्तिक शु. १ शके १८३३

श्री

## मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ।

या संसारांत मनुष्यमात्रास बद्ध करण्यास अथवा या प्रपंचांतून त्याची मुक्ति करण्यास 'मन' हें च एक समर्थ आहे. खरें ह्मटलें असतां हा संसार च मुळीं 'मना' नें कल्पिलेला आहे. ह्मणजे तो खरा नसून, आहे असें 'मना' नें भाविलें आहे; व ह्मणून ती कल्पना च जर 'मना' नें टाकिली तर या संसाराचा आपोआप च नाश होईल. जसा संसार 'मना' नें कल्पिला आहे तसा च मोक्ष हि पण कल्पित आहे. जीवास संसार हि नाहीं व मोक्ष हि नाहीं. जर संसाररूपी बंध च काल्पनिक तर त्या बंधाचा नाशरूप जो मोक्ष तो हि काल्पनिक च असला पाहिजे हें उघड आहे. स्वप्नांत असलेला मनुष्य आपण तुरुंगांत पडलेलों आहों असें प्रथम पाहून त्या बंधनाचें दुःख मानितो व नंतर त्यांतून मुक्त झाला ह्मणून त्यास सुखाची हि भावना होऊं लागते. वस्तुतः त्याचें बंदिवासांतील पतन व त्यापासून होणारें दुःख हें जसें मिथ्या होतें तसें

च त्यापासून झालेला मोक्ष व तज्जन्य सुख हीं हि मिथ्या च आहेत. तो जागा झाल्यावर त्यास बंध हि नाहीं व बंध च नव्हता तर मोक्ष तरि कुठला ?

परंतु ही स्थिति जागा झालेल्याची. हा वेदांत जे आपण निद्रेंत आहोंत त्यांस काय होय ! आह्मांस हा बंध खरा आहे असें धरून त्यांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करणें जरूर आहे. या प्रयत्नांत मोठा साहकारी ह्मणजे मन आहे. परंतु तें अत्यन्त चंचल व बहिर्मुख ह्मणजे प्रत्यक्ष दिसणाऱ्या व तात्कालिक सुखदुःख देणाऱ्या, विषयांकडे धांवणारें असल्यानें फार दुर्निग्रह व अनावर असें आहे. असें जरी आहे तरी त्याच्या साह्यावांचून परमार्थ साधत नाहीं. ह्मणून परोपरीनें त्यास बोध करून त्याचे ठिकाणीं 'विवेक' उत्पन्न करावयाचा ह्मणजे त्या 'विवेका' पासून त्यास अनायासें च 'वैराग्य' प्राप्त होतें; आणि ' विवेक वैराग्या ' वांचून या मनाची धांव खुंटणें अगदीं अशक्य आहे.

' अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते '

परंतु 'मनाची धांव खुंटणें' ही परमार्थांत फार वरची पायरी आहे.

मनाचें स्वरूप च मुळीं 'कल्पना' अथवा 'वासना' हें आहे. वासना नाहीं तर मन नाहीं; व मन नाहीं ह्मणजे वासना नाहीं. तेव्हां 'मना' ची धांव खुंटणें ह्मणजे मनुष्यानें वासनेचा क्षय करणें. त्या स्थितीस निर्विकल्प स्थिति ह्मणतात. तेव्हां मनाची धांव खुंटाविणें ह्मणजे मनाचा संपूर्ण नाश करणें आहे. तें 'विवेक वैराग्या' नें साधेल; परंतु मग तेथें 'बोधा' ची जरूर नाहीं. जिवंतपणीं बोध, मेल्यावर त्यास बोध कशाचा ? तेव्हां मनास बोध एवढ्याकरितां च करावयाचा कीं त्यानें दुष्ट विषयांकडे धांव घेऊं नये, चांगल्या विषयांकडे घ्यावी व अशा रीतीनें हळु हळु सन्मार्गप्रवर्ति होऊन अखेर निर्विकल्प व्हावें. या च दृष्टीनें श्रीसमर्थांच्या 'मनोबोधाचा' विचार केला तर त्यांत मुमुक्षु, साधक व सिद्ध या तिन्ही अवस्थांचें प्रतिबिंब स्पष्टतेनें दिसून येईल.

समर्थांचा हा 'मनोबोध' प्रसिद्ध आहे त्याप्रमाणें च इतर संतांनीं हि मनास बोध केला आहे; याचा

विचार केला ह्मणजे मन किति प्रबळ आहे हें लक्षांत येऊन त्यास आवरण्यास्तव सर्व संतांनीं कसे एकसारखे प्रयत्न केले आहेत तें दिसून येईल.

सर्वभूतीं 'मन' एकच. ह्मणून आपले 'मना' स केलेला उपदेश हा इतरांस केलेल्या उपदेशाप्रमाणें च आहे. ह्मणून निरनिराळ्या शतकांत लिहिले गेलेल्या उपदेशांचा मासला पुढें दिला आहे.

'बुधबावनी' चा लेखन संवत १६३३ माघ शु॥ १४ हा आहे. ह्मणजे शक १४९८ चे सुमारास हा काल येतो. पृष्ठ ९ वरील टिपेंत दिल्या प्रमाणें १६३३ हें संवत असावें हें निश्चित आहे. गुजराथी लोकांत संवत लिहिण्याची पद्धत आजलग प्रचलित आहे व 'संघवी कान्हजी वनजी राजधर नी पोथी' या वाक्यावरून ही गुजराथी मालकाची पोथी आहे हें हि निश्चित आहे. लेखन शक जर १४९८ तर रचना शक तोच अगर तत्पूर्वीचा असला पाहिजे हें उघड आहे. तसेंच यांत भास्कराचार्यांच्या 'लीलावती' चा उल्लेख असा

त्यानें शक ११२८ ते शक १४९८ चे दरम्यान केव्हां तरी ही रचना झाली असली पाहिजे. भाषेवरून व त्यांत केलेल्या योगाच्या ( ओ. ५१ ) व सप्तविद्येच्या ( जारण, मारण इत्यादि ओ. ४ ) उल्लेखावरून शक १३--१४ शें मधील ही रचना असावी असें वाटतें. ओवी २७, ३२, ३६, ४७ व ५५ या वरून चारी वर्णांस स्वधर्मांचा हा उपदेश आहे हें उघड आहे. असल्या स्फुट प्रकरणाच्या कर्त्याच्या नांवाबद्दल व चरित्राबद्दल कांहीं उल्लेख करणें शक्य नाहीं.

' बोधचौसष्टीचा ' चा कर्ता ' दामोदर ' हा कोण व कोणते शकांतील या बद्दल निश्चित कांहीं सांगतां येत नाहीं. परंतु ' दत्त सांप्रदायी ' निरंजन माधवाचा शिष्य असावा अशी ६४ वे श्लोकावरून शंका येते. चौसष्टीची भाषा आधुनिक असून ' निरंजन माधवाच्या ' ' गुरुस्तोत्रा ' च्या धर्तीवर आहे.

या पुढील ' बुधबावनी ' वर आह्मी टीप दिलेली च आहे. श्रीमद्दासबोध २×४ यांत व इच्यांत अत्यन्त साम्य

आहे. इच्यांतील कांहीं कांहीं पाठ विचार करण्यासारखे आहेत. श्रीमद्दासबोध रचनाकालीं श्रीसमर्थांजवळ एक अनंतकवि ह्मणून होते त्यांची तर ही ' बावनी ' नसेल ?

' वैराग्यशतका ' चे कर्ते कोणी ' नाथस्वामी ' होते व ते बाळस्वामीचे शिष्य होते एवढें त्यांत स्पष्ट च आहे. आमच्या एका सन्मान्य मित्राच्या सांगण्यांत ' खुषरंग हजारा ' वगैरे स्फुटप्रकरणाचे कर्ते जे ' सदानंदस्वामी ' होऊन गेले तेच हे नाथस्वामी होत. हें खरें असल्यास ( व तसें असणें संभवनीय आहे ) पुढें दिलेलें ' वैराग्यशतक ' शक १६ चे मध्यभागांत झालें असलें पाहिजे. भाषेवरून हि तसें अनुमान काढणें गैरवाजवी होणार नाहीं. श्रीसमर्थांप्रमाणें जोरदार व स्पष्ट अशीच या शतकाची भाषा आहे. असो.

' बद्ध व मुमुक्षु ' दोघांस हि या बोधवैभवापासून बोध होवो ही सद्गुरूंस प्रार्थना आहे.

गो. का. चांदोरकर.

श्री

# ॥ बुधबावनी ॥

श्रीगणेशायनमः ॥ ॐ र्वांये शंभु गाईजे । मनीं वोषंटे न धाईजे । वोलषां (न) पडो न्येर्दाजे । तस्करासी ॥१॥
नमो कीजे गोविंदा । न लागीजे झकेवादा[2] ।
न करीजे नींदा । साधुजनाची ॥ २ ॥
मनीं द्रढ होईजे । महाविघ्न चुकवीजे ।
मती ठकु[3] पाहिजे । पुढिलांचा ॥ ३ ॥
शिव शिव ह्मणिजे । सप्तविद्या[4] अभ्यासिजे ।
सिकविले कीजे । वडिलाचे ॥ ४ ॥
धर्मी मति द्यावी । धनवृद्धि वाढवावी ।
धुमाली न खेलावी । राणीवासा ॥ ५ ॥

---

१ जुने पोथींत 'ख' चे ठिकाणीं सर्वत्र 'ष' लिहिलेला आढळतो. कां? २ वितंडवाद. ३ धार. ४ (?) ५ अंतर्गृह.

अवगुण सांडीजे । अपसेर न बोलीजे ।
अनंदा न कीजे । वित्ताशा सारीषे ॥ ६ ॥
आदिनाथी भजिजे । आलेया आदरु कीजे ।
आशाभंगु न कीजे । याचकाचा ॥ ७ ॥
ईश्वरीं कीजे भक्ति । इतुकी पाविजे फलप्राप्ति ।
इत्यादिक दोष हरती । ऐसे जाणा ॥ ८ ॥
ईछा वोषटी सांडीजे । ईश्वरु मनीं ध्याइजे ।
इछा भावो धरीजे । गुरुचरणी ॥ ९ ॥
उसीरा न करीजे मार्गु ॥ उणीयासी न की(जे) संगु ।
उपशमु कीजे रागु । अस्त्री बालकावरी ॥ १० ॥
उधारु मैत्रासी न दीजे । उपदेसु गुरुचा कीजे ।
वोलखोनि भजीजे । अतीतासी ॥ ११ ॥
रिषेश्वरांते भजिजे । रिकामे न राहिजे ।
रीतांसी चालिजे । आपुली ॥ १२ ॥

---

१ अपशब्द? २ आलल्यास. ३ चालिजे.

रिण कवणाचे न राषीजे । रिणकेला तर न वाहीजे ।
रीता हाती न भेटिजे । देवगुरुस्वामीसी ॥ १३ ॥
लीलाविनोदे वर्तिजे । लय परमेश्वरी धरीजे ।
लींग अपुज पुजीजे । सुफल होऐ ॥ १४ ॥
लीलावती गणित पाहिजे । लिहीत चांग वांचौ जाणिजे ।
लिपींत न व्हीजे । पापगोष्टी ॥ १५ ॥
ऐक धाईजे सतगुरु । तीणे पावीजे पैलापारु ।
ऐकु कीजे धर्म थोरु । तरी जीणें ॥ १६ ॥
ऐसे वोजा वोलगीजे । ऐलीं पैली भक्ती न लागीजैं ।
ऐसी च जाणीजे । ज्ञान ऐक ॥ १७ ॥
वोलषूनि व्यापारु करीजे । वोसे पुरे जाणीजे ।
वोषटे न वोलीजे । कवणासी ॥ १८ ॥
अवल द्रुम जाणीजे । आंधुत्र वोलखीजे ।
औसरु जाणीजे । भलतैसा ॥ १९ ॥

---

१ (?) २ तृतिया, पापगोष्टींनीं.

आंध वाटे लावीजे । अंबा पार्वती पूजीजे ।
आसु बोलवीजे । ज्ञानमात्र ॥ २० ॥
आहाचक[1] नव्हीजे । आहारु थोडाची जेवीजे ।
आहारणु[2] न कीजे । गेलीया मेलीयाची ॥ २१ ॥
कलि भाडणें उभे न राहीजे । कपट मने न कीजे ।
कलंक लागो न दीजे । वंशासी ॥ २२ ॥
षडतर बोलीजे । षरे कुडे जाणीजे ।
षल आगी न राषीजे । जाणतेनी ॥ २३ ॥
गंगास्नान कीजे । गरुडध्वजु बोलगीजे ।
गति मति मागीजे । स्वामीसी ॥ २४ ॥
घराचारे वर्तीजे । घनवटपणे बोलीजे ।
घरी चोरून राषिजे । जाणतेनी ॥ २५ ॥
ज्ञानेचि कीजे गुरु । ज्ञानेची पाविजे पैलपारु ।
ज्ञाने विचारु । कीजे देषा ॥ २६ ॥

---

१ वरवर बोलणारा, वंचक. २ शोक, चिंता, वाहणें.

चवर धरिजे देवाचे । चरण वोलगिजे देवागुरुचे ।
चलन कीजे धर्माचे । सात्विक भावे ॥ २७ ॥
छत्र पाडो नेदीजे । छत्र बलकट धरीजे ।
छ ( श ) त्रु निर्दालीजे । बुधी करूनी ॥ २७ ॥
जडभारु नुचलीजे । जगमित्रु होईजे ।
जग जग न कीजे । जेवयावीण ॥ २८ ॥
झगडा होऊ नेदीजे । झटक अंगीं न राषीजे ।
झरा देपौनी षणवीजे । आड वेहरी ॥ २९ ॥
टकटक वायाक कवणासी न कीजे । टसणा न बोलीजे ।
टालणी न कीजे । धर्म विषि ॥ ३० ॥
ठाकुरपण भोगिजे । ठाणें जचन राषीजे ।
ठसा पाडीजे । नर्मामधी[1] ॥ ३२ ॥
डाहाकाडौर न वाजवीजे । डोईवाला हालो न्येदीजे ।
डावा डोली न राषी (जे) । घरी चोरु ॥३३॥

---

1 मनामर्धा ( ? )

ढलेया मंदिरी न राहीजे। ढलेयां द×ल षांबु घालीजे।
ढसाऽपण न कीजे। लोकावरी ॥ ३४ ॥
नारायणु चीत वीजे। नामस्मरण कीजे
नामे चि तरिजे। भवसागरु ॥ ३५ ॥
तपेश्वरांते भजिजे। तडक भडक न बोलीजे।
तलयां वोहलु मेलवीजे। पीकती साली उस ॥ ३६ ॥
थल बोलों जाणीजे। चटकरी उठिजे।
+ + + धर्माविषि ॥ ३७ ॥
दसेरेंणी भजीजे। दसरथ सुतू ध्याईजे।
दयामाया कींजे। सर्व जीवावरि ॥ ३८ ॥
धन कष्टीं जोडीजे। धर्मविषि वेचिजे।
धडफड जाणीजे। ज्ञान देषा ॥ ३९ ॥
नाथिले बोलीजे। नरकुंजरू वोलगीजे।
नकार न कीजे। धर्मविषि ॥ ४० ॥

---

१ (?) २ कष्टानें, ३ लवकर

पल्लीयां पाठी न लागीजें । पलतें गोरु न वाळीजे ।
परमेश्वरू वोलगीजे । भावे करुनु ॥ ४१ ॥
फड स्वामीसी न कीजे । फरसधरु वोलगीजे ।
फरारी ने घेईजे । धने धने वीणु ॥ ४२ ॥
बंदु जिव्हेसी दीजें । बरलपण न बोलीजे ।
+ + + वायावीण ॥ ४३ ॥
भलेपणें असिजे । भलतेणेसी कलहो न कीजे ।
भवसागरू तरीजे । गुरुकृपा ॥ ४४ ॥
मातापिता आर्चजे । मानु असला राखीजे ।
महादेवो स्मरीजे । अहर्निसी ॥ ४५ ॥
ऐकरुप ध्याईजे । ऐकीची भक्ती कीजे ।
ऐकेंची पावीजे । पैलपारु ॥ ४६ ॥
रसीक बोलीक आणावी । रडतेयां बुझावें ।
रणीं धीरु होआवें । संग्रामसमंई ॥ ४७ ॥

ळळा बाळकां नदिजें । ळटके न बोलिजे ।
ळांछन ळागो नेदीजे । कुळासी ॥ ४८ ॥
वासना वोपटी संडिजे । वासुदेवो वोळगीजे ।
वारीळा संबंदु कीजे । वडीळाचा ॥ ४९ ॥
सहस्रनाम जपीजे । सद्गुरु सेवींजे ।
सहस्रदळीं राहीजे । नीरंतर ॥ ५० ॥
षट्‌चक्र भेदीजे । षडज्ञान न बोलीजे ।
षटुभागु जाणीजे । मनाचे देषां ॥ ५१ ॥
साधुजन वोळगीजे । सामुद्रिके पाहो जाणीजे ।
साळीग्राम पुजीजे । अहर्निसी ॥ ५२ ॥
हाहा हीही न कीजे । हरीता आंगु न धरीजे ।
हाते धर्मु कीजे । आपुलेनी ॥ ५३ ॥

---

१ ब्रह्मरंध्र तेथें प्राणधरणा करणें हीं योगाची अखेरची पायरी आहे. २ मूलाधार स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध. व आज्ञा अथवा अग्नि अशीं शरीरांत षट चक्रें आहेत. त्या प्रत्येकाचा मंत्र, त्यांची देवता हीं निरनिराळीं आहेत. तितका जप होई तों त्या त्या चक्रावर योगी मन स्थिर करतात.

छटिके न बोलीजे । लीला बालकासी न दीजे ।
लंबिका आचरिजे । जाणतेनी ॥ ५४ ॥
क्षत्री धर्मु चालवीजे । क्षत्रनीति राहीजे ।
भेलु न मोडिजे । बालकेसी ॥ ५५ ॥

---

इति श्री बुधबावनी समापत । स्वंत १६३३ वरदये माहा सुदी १४ सुके लिषितं संघवी कान्हजी बनजी राजधर नी पोथी.

---

१ हा विक्रम संवत आहे. भाषेच्या दृष्टीनें व गुजराथी मनुष्याचें नांव खालीं दिलें आहे यावरून हा संवत् च असावा. याचा शक जवळ जवळ १४९८ म्हणजे श्री एकनाथाच्या वेळेचा येतो. हा रचनाशक अथवा लेखन शक असावा.

## श्री देव दत्तायनमः अथ बोधचौसटी

भज नित्य निरंतर रूप तुझें।
भवपाश निवारण हे सहजे।
दुष दूर करी भव हो नुपजे।
गुरुराज दयापद पावन जे ॥ १ ॥
मन उन्मन होय जया जपतां।
तुझी पाहा तजूनी ममता।
करुणानिधि श्रीगुरु जो पुरता।
विसरूनि मनिं भलतें वदतां. ॥ २ ॥
नको चाड धरूं इहभोगसुखीं।
गुरुनाम निरंतर बोल मुषीं।
मन निश्चळ निर्मळ होय जरी।
तरि सार्थकता भवसिंधु तॆरी ॥ ३ ॥

---

टीप-यांत 'ख' हा 'ष' सारखा लिहिलेला आहे. 1 तरशील-

धरसी भर हा विषया न्नि वरी।
तरिं सार्थकता कसि होय पुरी।
भज आवडुनी गुरुदत्तपदा।
मग त्यास नसे भवभा ध (न?) कदा ॥४॥
करी सारमनां दृढ राखि मना।
तरि योग बरा सुख नीत धना।
धरुनी चरणा गुरुदेव ह्मणा।
इतुकेनि कदा नपडा बंधना ॥ ५ ॥
×ता किति लौकिक कर्कशता।
येणे सुष नसे सहसा वदता।
परि नामेक बंधन होय जिवा।
ह्मणौनि भज वेगीं अनंत शिवा ॥ ६ ॥
नको निष्ठुरता धरिसी तुं मनीं।
हृदयास दया करि सत्यपणीं।
पद (यौ) ग विराजित जें सकळी।
धरी सार सदा असुनी जवळी ॥ ७ ॥

वद सार निरंतर नाम गुरु ।
नको साधन आणिक कांहीं करूं ।
त्यज जाणुनी हा तव लोकभरु ।
मग काळु नये तुजला सितरु ॥ ८ ॥
करुणानिधि श्रीगुरुचे चरणीं ।
शरणागत होऊनि घेई धणीं ।
नको आणिक कष्ट उगेचि करूं ।
तेणे संसृतीचा न तुटे चि भरूं ॥ ९ ॥
धरि आवडि हे भजनीं गुरुचे ।
सुख पावसि ++ चे ।
निज नित्य निरामय जे पुरते ।
मन उन्मन होइल रे निरुते ॥ १० ॥
नको संग धरू गुणमात्र करूं ।
वद आदरुनि जगदादिगुरु ।
अध ऊर्ध पदा झाणि आणि सदा ।
येकी येकपण न सरे चि कदा ॥ ११ ॥

मन आकळुनी विषयां दमुनी ।
निजरूप निरंतर ध्यान वनीं ।
गुण दोष निवारण ×× ।
गुरूराज कृपें तुज होय धनी ॥ १२ ॥
अभिवंदन स्वामि गुरूसी करा ।
येक निर्मळ भाव धरूनि वरा ।
संत सज्जन वोळग भक्तिवळें ।
भवजाळ जळूनि प्रपंच पळे ॥ १३ ॥
मद मछर दंभ प्रपंच नको ।
मनि काम विकार धरू चि नको ।
भ्रुगत ++ क यासि च संग नको ।
भेद मानुनी संसृति पाहुं नको ॥ १४ ॥
घरदार कुटुंब असे जरि हे ।
मन मानिजे केवळ स्वप्नमये ।
स्वये देह कमा जड फोड जसा ।
असे मानुनि घे गुरू दत्तदशा ॥ १५ ॥

---

१ पूर्णता, तुष्टि.

धरि शुद्ध विचार प्रपंच कसा ।
रज्जु भासत थोर भुजंग जसा ।
भय मानिति अंतरी ज्या न कळे ।
तशी संसृति भासत दृष्टी चळे ॥ १६ ॥
जेविं भासत भूषण हेमपणीं ।
तेवि पाहिजे ब्रह्म हे सत्य जनीं ।
नसे तंतुपटीं भेदभान खरें ।
तसें जाण स्वरूपीं नसे दुसरें ॥ १७ ॥
जन बोलति देव नसे जवळी ।
ह्मणुनी फिरती अवनी सकळी ।
देव आपुले अंतरीं वर्ततसे ।
नकळूनि तया दुरि पाहतसे ॥ १८ ॥
चित्त चैतन्य होय जयाकारितां ।
जेणें पावत हें मन चंचळता ।
बुद्धी बोध करीत प्रकाशपणें ।
अहंकार मुळीं घेई संतखुणें ॥ १९ ॥

संत सज्जन देखुनि वोळगती ।
शरणागत होऊनि शुद्धमती ।
तरि भक्तपणा मुळिं ठाव नसे ।
अवघाचि वरा मग देव दिसे ॥ २० ॥

नभ मारुत द्योतक अंबु मही ।
भूत पंचक भाव नसे चि कही ।
येक आत्मरूपि जगदभ्र दिसे ।
बोध वायु बळें भ्रम होत असे ॥ २१ ॥

त्रिगुणापरते त्रिगुणीं वसते ।
गुणभाव नसोनि गुणा करिते ।
गुणलक्षण वोळख नाम धरी ।
तोचि जाणुनी हा भवपूर तरी ॥ २२ ॥

क्षर अक्षर दोन्ही नसोनि मुळीं ।
मग उत्तम मध्यम कोण कळी ।
जन भेद विकार करूं चि नको ।
मन कल्पित भाव धरूं चि नको ॥ २३ ॥

प्रणवामुळ जे सकळासि रजे ।
तुरिये वर जे असे उन्मन जे ।
सुषमंडण जें चित्त चैतन्य जे ।
न सरेचि दुजे पद पावन जे ॥ २४ ॥

अज अव्यय लक्षण हें करितां ।
व्यय जन्म नमीचि मुळी धरितां ।
घृत थीजुनि हांत कनिष्ठ थकों ।
जनभेद दिसे स्वरूपीं असकों ॥ २५ ॥

अकार उकार मकार तिन्ही ।
त्रिपदा त्रिविधा त्रिगुणी त्रिपणी ।
त्रिपुटी अँर जे असे अच्युत जें ।
वदनीं वदतां वचना नये जे ॥ २६ ॥

---

१ शिर ज= अग्र, प्रथम, श्रेष्ठ ( ? ) २ ( ? ) ३ नसलेला असत्य. ४ येथें 'अरजे' असें असल्यास २४ श्लोकांतील 'रजे' प्रमाणें या येथें कांहीं अर्थ असावासा दिसतो.

धरी संगत हे सज्जनाचरणीं ।
तुझें होईल हीत तेणें करूनीं ।
झंणि[1] आणषि वेध मनासि धरूं ।
बहु साधन विधं[2] नको चि करूं ॥ २७ ॥

गुण निर्गुण भाग जरी करिसी ।
तरी संसृति होईल निश्चयेसी ।
गुण संग विचार मुळीं च नसे ।
मग निर्गुण हे ह्मणसील कसे ॥ २८ ॥

जरि निर्गुण भाव धरीसि मनीं ।
तरि लागेल गुण तेणें करूनि ।
गुण निर्गुण यांतुनि एक दिसे ।
येकीं दोनपणीं रूप होत असे ॥ २९ ॥

---

१ ज्ञानेश्वरीतील निषेधार्थ क्रियाविशेषण २ 'विध' हें 'बहु' चे पुढें पाहिजे 'बहुवेध'

मन उन्मन बोलति भेद बळें ।
मन नाहिंच मूळ स्वरूप कळे ।
तरि उन्मनता नसरेचि कदा ।
नसे ठाव पहा अधऊर्धपदा ॥ ३० ॥

नर नार विचार करीति जन ।
वस्तुभावपणीं नसे दोनपण ।
लहरी तरंग जसा भेद जळीं ।
तेविं ब्रह्मपदीं नर नारि फळी ॥ ३१ ॥

जन बोल विचार जरी धरिसी ।
तरि नाशन हें इह संसृतिशीं ।
गुरुबोध विचारूनि राय मनीं ।
तुज होइल प्राप्त अखंडपणीं ॥ ३२ ॥

---

१ ब्रह्मभाव २ खेळ.

नको चाड धरूं विषयाचि सदा ।
शरणागत होइजे संतपदा ।
संत बोधती बोध अगाधपणीं ।
ते चि सुख खरे असें जाण मनीं ॥ ३३ ॥

द्वैत अद्वैत हे कथनी करिती ।
नसे द्वैत कदा उपजे निरुति ।
जरि द्वैत नसे अद्वैत कसे ।
उगलें धरिसी भवजाळ पिसे ॥ ३४ ॥

कोणही बोलती पुस्तक पाहुनिया ।
अंध चाले जसा दंड घेउनिया ।
तेवि पुस्तकभाव मनासि धरी ।
नसे दृष्टी प्रकाश कदा अंतरी ॥ ३५ ॥

अंध दंडबळे बहु चालुं ह्मणे ।
उंच नीच पुढील तया न कळे ।
तसें पुस्तक वाचुनी ज्ञान करी ।
नसे अनुभव त्यासि अती (च) दुरी ॥३६॥

गुरुराज कृपा जव पूर्ण नसे ।
तंव पुस्तक वाचुनी काय दिसे ।
ह्मणौनि करी गुरुवंदन हे ।
तरि होइल ज्ञान बरें परि हे ॥ ३७ ॥

कोण्ही बोलति तीर्थ व्रतासि करा ।
कोण्ही साधिति योग अष्टांग बरा ।
कोण्ही दंडिती देह तपे करिती ।
गुरुराजकृपेविण नाहिं गति ॥ ३८ ॥

किति बोलति विष्णु पुजा करिजे ।
किति शक्ति शिवा समता भजिजे ।
किति भास्कर धुंडिसी वोळगती ।
गुरुराज कृपेविण नाहि गति ॥ ३९ ॥

जप लाउनि डोळे सदा करिती ।
नित्य नूतन भाव सदा धरिति ।
परि देवपणासि न ओळखतां ।
भक्तभावपणीं भजनासि रिता ॥ ४० ॥

यज्ञ याग करीन असें धरिलें ।
परि यज्ञपतींसी ते विसरले ।
परि यज्ञ करी बहु कष्टुनियां ।
स्वर्गसुख मनासिच मानुनिया ॥ ४१ ॥

---

१ गजानन.

जंव पुण्य असें तवं स्वर्गी वसे ।
मग घालति मागुति गर्भदशे ।
जेथें पुण्य नसे तेथें पाप नसे ।
पद पावन येकचि येक दिसे ॥ ४२ ॥

पुण्य पातक नित्य सदा करिति ।
असे पाप लघु बहु पुण्य किती ।
तरि स्वर्ग सुखासिचि वोळगति ।
पुण्य भोगुनि मृत्युजनासि येति ॥ ४३ ॥

जरि पुण्य लघु असे पाप बहु ।
तरि होइल नर्क तयासि उभंड[1] ।
सम तुल्य पदिं अघपुण्य असे ।
तो चि मानवीकायेसी[2] येत दिसे ॥ ४४ ॥

---

१ उघड लागलींच २ देह.

जव पुण्य असे तव पाप दिसे ।
परि पुण्य पणीं भव ना निरसे ।
म्हणौनि गुरुपद वोळगिजे ।
तेणं हा भवजन्म नुरे सहजे ॥ ४५ ॥

किती बोलति वर्ण स्वधर्म करा ।
तेणे चुकेल हा भव जन्म खरा ।
तरि धर्मपणा मुळीं ज्ञान नसे ।
करिता चि तया अधर्म दिसे ॥ ४६ ॥

जड होऊनि येक सदा असति ।
तरि पर्वतरूप तया म्हणती ।
जड चैतन्य याहुनी जे पर ते ।
न कळुनी करी मानेल (चि) ते ॥ ४७ ॥

येक जाले पिसे येक बाळदशे ।
येक मुग्ध चि राहनि झाड जशे ।
येक सांडित वर्णे स्वधर्मपणा ।
परि नाहिचि प्राप्ति गुरूविना ॥ ४८ ॥

किति गातिल हरी नाम किर्ति ।
काम किति मन मारुनि आवरिती ।
किति बोलति सत्य त्यजूनि असत्य ।
परि निजसत्य नव्हे गुरुविण प्राप्त ॥ ४९ ॥

किति होतील साधु करीतिल बोधु ।
स्वजातिल क्रोधु सदा निज शांत ।
जगाहुनि सान नसे अभिमान ।
कथी जऱ्ही ज्ञान तऱ्ही असे भ्रांत ॥५०॥

येक दंड धरी येक लिंगधरी ।
येक लुंचितकेश दयाखिकरी ।
येक कान चिरी वधी ( ? ) जीव धरी ।
येक लाउनि भस्म जटा पसरी ॥ ५१ ॥

येक गायत्रि मंत्र सदा जपति ।
गळा जानवें घालुनि वेदमति ।
असे मत्त जसें वेदज्ञान तसे ।
परि नेणति आपण कोण असे ॥ ५२ ॥

इंद्रियातीत होऊनि वर्ततसे ।
मन चंचळ ज्याचेनि होत असे ।
परि इंद्रियभाव नसे मनता ।
यासि होउनि साक्षि असे परता ॥ ५३ ॥

गुरुराजकृपा पुरी असता ।
तरि नाहि भव सहसा वदता ।
दिसे सर्व जन्हि येक ब्रह्मतरी ।
तरि नसे जन्म संसृति देह उरी[1] ॥ ५४ ॥

नसे पिंड ब्रह्मांड विभागपणें ।
नसें कारण कार्य स्वभावगुणें ।
नसे उत्पत्ति जागृति स्वप्न स्थिति ।
नसे घोर सुषुप्ति संहार गति ॥ ५५ ॥

नसे साक्षित्व तूर्य पदा धरिता ।
नसे जाण कदा प्रणउ वदता ।
नसे देह चतुष्टय देहपणें ।
येक केवळ आत्मप्रभा ह्मणणें ॥ ५६ ॥

---

१ ( नाम ) उरणें.

सुख दुःख नसे परि सूष कसे ।
ह्मणोनि जसा तूं तसा चि असे ।
कांहिं घेउ नको कांहीं टाकूं नको ।
सहज स्वरूपासी तूं सांडूं नको ॥ ५७ ॥

सहजीं सुखता सहजी दुषता ।
सहजान्वय भाव असा असतां ।
सहजपणां मुळीं ठाव नसे ।
कोठे शब्द विकार क + + ॥ ५८ ॥

नभीं वीजप्रभा करि चंचळता ।
षळु ना चळुते परि नास्तिकता ।
वीज लोपति शून्य असे गगनीं ।
तसी देहप्रभा अस्त ब्रह्मपणीं ॥ ५९ ॥

नसे देहपण नसे भूतपण ।
नसे इंद्रियभाव नसे चि मन ।
नसे स्थूळ लघू नसे अल्प बहू ।
कांहिं कल्पित भाव नसे उगउ ॥ ६० ॥

नसे बोधपद नसे वादपद ।
नसे ज्ञान विज्ञान अज्ञानपद ।
नसे ज्ञान समाधि नसे असमाधि ।
हे नित्यसमाधि अखण्ड सिध ॥ ६१ ॥

नसे नित्य अनित्य विचारपहा ।
किति नित्य असत्य करीत आहा ।
कांहीं अंतर बाहिर भाव नसे ।
परि पूर्ण अपूर्ण व्यर्थ असे ॥ ६२ ॥

काहीं कल्पित भेद जरी हि दिसे ।
तरि त्यास सदा भवभान असे ।
जसे धत्तुर सेउनि व्यर्थ वदे ।
भवभान नसूनि उगाचि कुदे (फुंदे) ॥ ६३ ॥

उकली भवजाळ विचारूनिया ।
गुरूदत्त असे ह्मणिजेचि तया ।
करि आदरुनि निज भक्ति करी ।
गुरूदत्त निरंजन नाम धरी ॥ ६४ ॥

बोध चौसटि जे करिती श्रवण ।
तरि त्यासि नसे भय आदरूनी ।
वदे दामोदर भज दिगंबर ।
नसे आणिक याहुनी तत्व पर ॥ ६५ ॥

॥ इति बोधचौसष्टि ॥

श्री

# ॥ बुधबावनी ॥

अथ बुधबावनी लिख्यते

श्रोते व्हावें सावधान । आतां सांगेन उत्तमगुण ।
जेणें होईल ज्ञान । उत्तम गुणाचें ॥ १ ॥
वाट पुसल्याविण जाऊं नये । फळ ओळखल्यावीण खाऊं नये ।
सांपडली वस्तू घेऊं नये । येका येकी ॥ २ ॥
विचारेविण बोलूं नये । विवेकावीण चालूं नये ।
मर्यादेवीण हालूं नये । कांहीं तरी ॥ ३ ॥

---

टीपः—दासबोध द. २ स. २ यांत ' उत्तमलक्षणें ' सांगितलीं आहेत. तीं व सांप्रतचीं ' बुधबावनीतील ' लक्षणें बहुतेक सारखीं च आहेत. दा. तील कांहीं ओ. यांत नाहीत व यांतील त्यांत नाहीत. जेथें जेथें विशेष महत्वाचा फरक आहे तेथें तेथें दा. तील ' वचन ' दिलेलें आहे. दासबोध व बुधबावनी यांतील पुरातन कोण या प्रश्नांत अ झा पडत नाहीं.

प्रीतिवीण रुसूं नये । चोरासी ओळख सांगूं नये ।
रात्रीं पथ क्रमू नये । यकायकीं ॥ ४ ॥
जनीं आर्जव तोडूं नये । पापविषय जोडूं नये ।
पुण्यमार्ग सांडूं नये । कदा काळीं ॥ ५ ॥
निंदा द्वेष करूं नये । असत्यसंग धरूं नये ।
द्रव्य दारा हारूं नये । बळात्कारें ॥ ६ ॥
वक्त्यासी छेडूं नये । आइकल्यासी खोडूं नये ।
विद्याभ्यास सांडूं नये । कांहीं केल्या ॥ ७ ॥
तोंडाळासी भाडूं नये । वाचाळासी तंडूं नये ।
संतसंग खंडूं नये । अंतरयामी ॥ ८ ॥
अति क्रोध करूं नये । जिवलगासी तोडूं नये[१] ।
मनीं वीट मानूं नये । शिकवणाचा ॥ ९ ॥
क्षण क्षणा रुसूं नये । लटिका पुरुषार्थ बोलूं नये ।
केल्यावीण सांगूं नये । आपुला पराक्रमू ॥ १० ॥

---

१ दा. ऐक्यतेसी फोडूं नये.

बोलिला बोल विसरूं नये । प्रसंगीं स्वार्थ चुकूं नये ।
केल्यावीण निखंडूं नये । पुढिलांसी कदा ॥ ११ ॥
आलस्यीं सुख मानूं नये । चाहाडी चोरी करूं नये ।
शोधल्यावीण वर्तूं नये । कार्यें कांहीं ॥ १२ ॥
सभे मध्ये लाजूं नये । बाष्कळपणें बोलूं नये ।
पैजा होड घालूं नये । कांहीं केलियां ॥ १३ ॥
सुखा अंग देऊं नये । प्रेत्न पुरुषार्थ सांडूं नये ।
कष्ट करितां त्रासूं नये । निरंतर ॥ १४ ॥
बहुत चिंता करूं नये । निस्संगपणें राहूं नये ।
परस्त्रीसीं पाहूं नये । पायंधरूनि ॥ १५ ॥
कोण्हाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखूं नये ।
परपीडा करूं नये । विश्वासघात ॥ १६ ॥
चोजें वीण असूं नये । मळीण वस्त्र नेसूं नये ।
जाणारासी पुसूं नये । कोठें जातोसी ह्मणौनिया ॥ १७ ॥

---

१ दा. सामर्थ्य. २ दा. निखंडु, तिरस्कार करणें. ३ दा. पापबुद्धी.

व्यापक वीण असूं नये । पराधीन होऊं नये ।
आपुले आयुष्य बोलुं नये । कोण्हा येकापाशीं ॥ १८ ॥
पत्रावीण प्रवर्तू नये । हीनाचें रिण घेऊं नये ।
रंगावीण जाऊं नये । राजद्वारा ॥ १९ ॥
लटिके झुंझ घेऊं नये । सभेसि लटिके करूं नये ।
आदरेवीण बोलूं नये । स्वाभाविक ॥ २० ॥
आंहो स्नानपान करूं नये । अन्याये वीण गांजूं नये ।
अवनीति वर्तुं नये । आंग बळें ॥ २१ ॥
बहुत अन्न खाऊं नये । बहुत निद्रा करूं नये ।
बहुत दिवस राहूं नये । पिशुनाचे घरी ॥ २२ ॥
आपुलियांची ग्वाही देऊं नये । आपुली कीर्ति वर्णू नये ।
आपुलें आपण हसूं नये । गोष्ट सांगतां ॥ २३ ॥
कामावीण राहूं नये । नीच उत्तर साहूं नये ।
अशुद्ध अन्न सेऊं नये । वडिलांचे हि ॥ २४ ॥

---

१ दा. पत्रेंविण पर्वत करूं नये २ दिवसरात्र ३ दा. जाजू=अरोप

तोंडीं शिवी असूं नये । दुसऱ्यास देखून हंसूं नये ।
उणें अंगीं संचरूं नये । कुळें वृत्तांत ॥ २५ ॥
देखिली वस्तू मागूं नये । बहुत उच्छृंखळ होऊं नये ।
जिवलगासी करूं नये । कलहो कदां ॥ २६ ॥
कोण्हाचा घात करूं नये । लटकी ग्वाही देऊं नये ।
अप्रमार्थ वर्तूं नये । कदाकाळीं ॥ २७ ॥
चाहाडी चोरी करूं नये । परद्वार धरूं नये ।
मागे उणें बोलूं नये । कोण्हा येकाचे ॥ २८ ॥
समई येवा चूकूं नये । सत्व गुण सांडूं नये ।
वैरीयासी दंडूं नये । शरण आलिया ॥ २९ ॥
अल्प धनें माजूं नये । हरीभक्ती लाजूं नये ।
मर्यादेवीण चालूं नये । प्रसिद्ध जाना-(जनीं) ॥३०॥
मूर्खासी संमध पाडूं नये । आंधारीं रात्रीं चालूं नये ।
दुत्पळपणें विसरूं नये । वस्त आपुली ॥ ३१ ॥

---

१ दा. कुळवंताचें. २ दा. चोरु. ३ दा. अप्रमाळा. ४ दा. दुश्चित्तपणें.

हरिकथा सोडूं नये । निरूपण तोडूं नये ।
परमार्थ मोडूं नये । प्रपंचबळे ॥ ३२ ॥
स्नान संध्या सांडूं नये । कुळाचार खंडूं नये ।
आ[1]चार मोडूं नये । चुकुरपणें ॥ ३३ ॥
देवाचा नवस बुडवूं नये । आपुला धर्म सांडू नये ।
भलते फंदीं धरूं ( भरूं ? ) नये । विचारेवीण ॥ ३४ ॥
नि:संगप[2]णें राहूं नये । जीवहत्या करूं नये ।
पाठदेऊन जाऊं नये । धर्मासी कदा ॥ ३५ ॥
सभा देखून गळूं नये । समयीं उचितं[3] चुकूं नये ।
कीर[4]तां धर्म त्रासूं नये । धारीष्टी आपुलें ? ॥ ३६ ॥
गुरु विरहित असूं नये । नीच यातींचा गुरु करूं नये ।
ज्ञानें शाश्वत मानूं नये । वैभवाचे ॥ ३७ ॥
सत्यपंथसाडूं नये । असत्पंथीं जाऊं नये ।
अभिमान घेऊं नये । असत्याचा ॥ ३८ ॥

---

१ दा. अनाचार मांडू. २ दा. निष्ठूरपण धरू. ३ दा. उत्तर ढळों. ४ दा. धि:करितां चळों ५ दा. जिणें.

अपकीर्ती ते सांडावी । सत्कीर्ति वाढवावी ।
विवेकबुधि धरावी । मनामाजी ॥ ३९ ॥

आयुष्य आपुले सांगूं नये । द्रव्य आहे ह्मणूं नये[1] ।
मोहोद्वार दाऊं नये । भलत्यासी कदा ॥ ४० ॥

मित्रा मैथुन सांगूं नये । दान केलें ह्मणूं नये ।
अपमान सांगूं नये । शत्रूं पासी ॥ ४१ ॥

नदीचा विश्वास करूं नये । नखीचा भरवसा धरूं नये ।
श्रृंगीयासी पातेजूं नये । कदाकाळी ॥ ४२ ॥

शस्त्री समीप चालूं नये । सरदार जै सानुकूल ह्मणूं नये ।
स्त्रीचा भरवसा धरूं नये । निभ्रांत जाणा ॥ ४३ ॥

तीर्थास जाता फिरऊं नये । गुरुभेटीस वर्जूं नये ।
देता आड येऊं नये । दानासी कदा ॥ ४४ ॥

---

1 येथपासून पुढील ओव्यास दासबोधांत या समासांत समानार्थ ओव्या नाहींत.

परस्त्रीसि चित्त लाऊं नये । नित्य स्थळा जाऊं नये ।
निश्चळपणें राहूं नये । निशीच्या भरीं ॥ ४५ ॥
परस्त्री रजस्वला होये । तीसी अंग लाऊं नये ।
रावणाचीं दाही शिरें पाही । गेली तिचेनि संगें ॥ ४६ ॥
जन्म आलियावर । गुरु करावा हा निर्धार ।
जे न करिती नारीनर । ते जाणावे पशुयोनी ॥ ४७ ॥
येऊनीया मनुष्य जन्मास । कांहीं करावा शास्त्राभ्यास ।
तेणें होईल ज्ञानप्रकाश । पिंडा माजी ॥ ४८ ॥
जीव आला मनुष्य योनीं । परमेश्वर स्मरण नाकै कानीं ।
तो पडला बंधनीं । येमाचीये ॥ ४९ ॥
ऐसे बुधबावन्नीचे बोलणें । जे मानिति असत्य करून ।
ते जाणावे पापी दुर्जन । महा पातकी ॥ ५० ॥
या बुद्धीनें जे चालती । तयासी मान्य होईल बहुता रीती ।
ऐसे परी धन्य ते हरी नाम बोलती । जगासि पै ॥ ५१ ॥

॥ इति बुधबावन्नी ॥

श्री

# वैराग्य शतक

नमो श्रीगुरु सद्गुरु बाळस्वामी ॥
असे व्याप्य तूं व्यापका बाळस्वामी ।
गणाधीश तूं तूं चि अंबाभवानी ।
किजे काय या दुर्जना बा भवानी ॥ १ ॥

असे धर्म हा ब्राह्मणाचा सुदक्षा[1] ।
करि वेद हि स्थापना शुद्ध भीक्षा ।
गृहस्थानि माधूकरी ती त्यजावी ।
सुखें नित्य कोरान्न भीक्षा करावी ॥ २ ॥

नसे सौख्य कांहीं च भिक्षे समाना ।
प्रतिग्रह नाहीं च नाहीं च [व ?] माना ।
असे सत्र हे शंभुचे आदरावी ।
सुखें नित्य कोरान्न भीक्षा करावी ॥ ३ ॥

---

1 ब्रह्मचाऱ्यास मात्र भिक्षा सांगितली आहे असें पुढील चरणावरून दिसतें. षट्कर्मा पैकीं ' प्रतिग्रह' एक आहेच.

नसे दैन्य ग्लानि भयाची हि वार्ता ।
अहंकार दुर्मच्छरादिक वार्ता ।
सुकल्पीत हे कामधेनु धरावी ।
सुखें नित्य कोरान्न भीक्षा करावी ॥ ४ ॥

असे साधुसी प्रीय भिक्षा अपाडि[1] ।
महायोगीयासी इची फार गोडी ।
अति निस्पृहा जीविका[2] हि वरावी ।
सुखें नित्य कोरान्न भीक्षा करावी ॥ ५ ॥

करीं नित्य भिक्षा पढे आत्मविद्या ।
तेणें ही तुझी सर्व तुटे अविद्या ।
त्यजूनि अधर्माची वृत्ति परावी ।
सुखें नित्य कोरान्न भीक्षा करावी ॥ ६ ॥

---

१ अपाडें=सत्वर याचें स्त्रीलिंगी रूप? २ उपजीविकेचे साध.

वाणी आणि क्षेत्री तथा शूद्रजाती ।
न भिक्षेसी तिन्ही अधिकारी होती ।
श्रुति योग्य हे ब्राह्मणासी च दावी ।
सुखें नित्य कोरान्न भीक्षा करावी ॥ ७ ॥

अतिथी मुनी आणि अभ्यागतासी ।
गुरू विप्र त्या ब्रह्मचारी यतींसी ।
जगीं अन्नदाता हि कीर्ति भरावी ।
सुखें नित्य कोरान्न भीक्षा करावी ॥ ८ ॥

महाराज श्रीमंत तो देव आहे ।
धंणी आणि स्वामी प्रभू तोचि पाहे ।
तयासी चि सर्वत्रें हा प्राण दीजे ।
कदापि नराची स्तुति त्वां न कीजे ॥ ९ ॥

---

१ तिन्ही शब्द एकार्थीच आहे. २ सर्वथैव ?

नराच्या स्तुतीनें अधोवृत्ति[1] होते ।
नराची स्तुति रौरवामाजी नेते ।
हरी अन्नदाता हि साहेब साजे ।
कदापि नराची स्तुति त्वां न कीजे ॥ १० ॥

नराच्यापुढें ढुंग कां हालविसी ।
नराच्यापुढें शीस कां लववीशी ।
ह्मणोनि हरीचे सदा ध्यान कीजे ।
कदापि नराची स्तुति त्वां न कीजे ॥ ११ ॥

नमो जि नो ( नमो जि नमो ) दुर्जना कां करीसि ।
सदा लोणि अंडास कां चोपडीसी ।
खळाच्या पुढें मान कां खालवीजे ।
कदापि नराची स्तुति त्वां न कीजे ॥ १२ ॥

---

१ मनोवृत्ति हलकी होते.

हरी भक्त काय सदा उपवासी ।
गेला प्राण त्याचा तु हि जीवे जासी ।
असा बावळा कां शठासीं नमींजे ।
कदापि नराची स्तुती त्वां न कीजे ॥ १३ ॥

हरी तो पिता आणि माता जगाचा ।
तया त्यागुनी दास जाला मूढाचा ।
कुटीळा पुढें नाचसी नित्य भोजे[1] ।
कदापि नराची स्तुती त्वां न कीजे ॥ १४ ॥

महामूर्ख गर्विष्ट जे धुंद जाले ।
महापापि फंदि हरामी खतेले ।
तयासी कसें त्वां सदा मानवीजे[2] ।
कदापि नराची स्तुती त्वां न कीजे ॥ १५ ॥

---

१ आवडीनें. २ हा प्रयोग चमत्कारिक दिसतो. मानवीजे= मान दिला गेला असा करणें.

निधी आणि सिद्धि हि चिंतामणीचा ।
हरीं निर्मिता सर्व कल्पद्रुमाचा ।
हरी सोडुनी दुर्जना वंदिसी तुं ।
धनाढ्या पुढें दांत कां काढिसी तूं ॥ १६ ॥

गल्लीमाजि वेंचुनि चिंध्या जुनाटा ।
करी मेखळा खाय कोरान्न घाटा ।
धनांधासी कां रे नमस्कारिसी तूं ।
धनाढ्या पुढें दांत कां काढिसी तूं ॥ १७ ॥

वनामाजि काय त्या गुंफा जळाल्या ।
द्रुमाच्या बऱ्या गार छाया पळाल्या ।
सुखें बांधुनी पर्णशाली कसे तूं ।
धनाढ्या पुढें दांत कां काढिसी तूं ॥ १८ ॥

---

१ कफनी सारखें वस्त्र, कटिसूत्र किंवा लंगोटी.

नद्याचीं जळें शीतळें काय जालीं ।
बिळे सोज्वळें डोंगराचीं बुजाली ।
धरा दुर्ज्जना कां उडी घालिसी तूं ।
धनाढ्या पुढें दांत कां काढिसी तूं ॥ १९ ॥

हरी तो उपेक्षा करी काय बापा ।
वृथा दग्ध कां होसि संसारतापा ।
मला दे मला दे सदा बोलसी तूं ।
धनाढ्या पुढें दांत कां काढिसी तूं ॥ २० ॥

हरी सांडुनी मानवाची स्तुती कां ।
हरी त्यागुनी पापियाची रती कां ।
यमाच्या पुढें जासि तोंडघसी तू ।
धनाढ्या पुढें दांत कां काढिसी तूं ॥ २१ ॥

---

१ हा श्लोक व या मागील दोन वाचून अमृतरायांचे पदाची आठवण कोणास होणार नाहीं ?

अति दुष्ट पाजी अभक्त कुयोगी ।
अधर्मी अनाचारी पाखांड भोगी ।
तयाच्यापुढें माकडा नाचसी तूं ।
धनाढ्या पुढें दांत कां काढिसी तूं ॥ २२ ॥

परस्त्रीसि बा फार बोलुं नको तूं ।
परस्त्रीसि वादि कधीं ना बकू तू ।
परस्त्रीगुणें पुण्य कांहीं न राहे ।
परस्त्री नको रे महापाप आहे ॥ २३ ॥

परस्त्रीगुणें ब्रह्मदेवासि भ्रांति ।
परस्त्रीगुणें शंभुसी शामकांति ।
परस्त्रीगुणें विष्णुंसी वेड पाहे ।
परस्त्री नको रे महापाप आहे ॥ २४ ॥

---

१ परस्त्रीमुळें शंकरास ' काळिमा ' आहे ही कथा कोणती ?
२ वृंदेमुळे विष्णूस वेड लागलें होतें.

परस्त्री गुणे रावणा नाश जाला ।
परस्त्री गुणे चंद्र तो हि बुडाला[1] ।
परस्त्री गुणें हीत कांहींच नो हे ।
परस्त्री नको रे महापाप आहे ॥ २५ ॥

परस्त्री गुणे हे किति दुःखी जाले ।
परस्त्री गुणे हे किति लोक मेले ।
परस्त्री गुणे हा महारोग देहे ।
परस्त्री नको रे महापाप आहे ॥ २६ ॥

परस्त्री नको हा नको संग खोटा ।
परस्त्री गुणें ये महत्वासि बट्टा ।
परस्त्री जिता रौरवासीच वाहे ।
परस्त्री नको रे महापाप आहे ॥ २७ ॥

---

१ गुरुस्त्रीशीं रत होऊन क्षयी झाला.

परस्त्रीसि हा हा हि हि हि नको गा ।
परस्त्रीसि येकांत ना तू शिकुं गा ।
जिता धाड गा राक्षसी लावसी हे ।
परस्त्री नको रे महापाप आहे ॥ २८ ॥

परस्त्री गुणें दुःख अंगासी दाटे ।
रसायनपारा हि देहासि फुटे ।
शिरी केश ना नासिका हि झडे हे ।
परस्त्री नको रे महापाप आहे ॥ २९ ॥

परस्त्री गुणें मुख्य राजा हि दंडी ।
परस्त्री गुणें सर्व द्रव्याचि सांडि ।
परस्त्री गुणें वीर्य अंगीं नसे हे ।
परस्त्री नको रे महापाप आहे ॥ ३० ॥

---

१ परस्त्री ही शुद्ध जिवंत धाड, राक्षसी, लांसी, आहे ?

परद्रव्य आंगांसि फाण (?) फुटेगा।[1]
परद्रव्य स थ हा (?) हि झटेगा।
परद्रव्य हे गा महादोष भारी।
परद्रव्य हें गा महाघातकारी। ३१॥

परद्रव्य कांहीं स्वीकारूं नको तूं।
परद्रव्य कांहीं न हातीं धरूं तूं।
परद्रव्य हे सूक्रतासी विदारी।
परद्रव्य हें गा महाघातकारी॥ ३२॥

परद्रव्य हें वर्णशां हि (?) शरीरीं।[2]
परद्रव्य हें पाडि बा जन्मघोरीं।
परद्रव्य हें सौख्य सर्वस्व हारी।
परद्रव्य हें गा महाघातकारी॥ ३३॥

---

१ (?) २ वर्णशारी–अंगावर शहारे आणणारें?

परद्रव्य हे तो कुळाचा क्षयो हे।
परद्रव्य हे तो विषासी समाहे[1]।
परद्रव्य हे नेतसे व्याभिचारी।
परद्रव्य हें गा महाघातकारी ॥ ३४ ॥

परद्रव्य हे नीच जन्मासि घालि।
परद्रव्य योगे चि हें पुण्य खाली।[2]
परद्रव्य हे पोटि लागे चि आरि[3]।
परद्रव्य हें गा महाघातकारी ॥ ३५ ॥

परद्रव्य योगेचि हि बुद्धि भ्रष्टे।
परद्रव्ययोगे समावृत्ति फाटे।
परद्रव्य हे रे बहूताासि मारि।
परद्रव्य हें गा महाघातकारी ॥ ३६ ॥

---

१ सम+आहे=समाहे. २ ३२ व्या श्लोकाचा ३ रा चरण पहा. ३ टोंचण.

परद्रव्य हें गा नको संग्रहासी ।
परद्रव्य हें ग्रह लागे ग्रहांसी ।
परद्रव्य हें घालि नाना विकारी ।
परद्रव्य हें गा महाघातकारी ॥ ३७ ॥

परद्रव्य योगे चि संसार भंगे ।
परद्रव्य हें सुकृता आग लागे ।
परद्रव्य योगें चि जाले भिकारी ।
परद्रव्य हें गा महाघातकारी ॥ ३८ ॥

ओले कोरडें जें मिळें तें स्विकारी ।
मिळो दिव्य पक्कान्न जें मिष्ट भारी ।
जसें दैवि जे तें पुढें सिद्ध पाहे ।
सदासर्वदा वृत्ति संतोष राहे ॥ ३९ ॥

---

१ घरास ग्रह लावणारें आहे. २ नाश करणारें आहे.

मिळो भाजिपाला मिळो मिष्ट गोळा ।
मिळो दिव्य तें वस्त्र चिंध्या सुकाळा ।
मिळो पादरक्षा मिळो शीबिका[1] हे ।
सदासर्वदा वृत्ति संतोष राहे ॥ ४० ॥

स्वधर्मे मिळो द्रव्य लक्षादि कोटी ।
मिळो पर्णकूटिं लंगोटी नरोटि ।
हवेली मिळो राजमंदीर गेहे ।
सदासर्वदा वृत्ति संतोष राहे ॥ ४१ ॥

स्तुति हे करो लोक आणि ( क ) निंदा ।
सुगंधे पुजो आणि घालोत बंदा ।
[2]चळुं तूं नको लोक आघात साहे ।
सदासर्वदा वृत्ति संतोष राहे ॥ ४२ ॥

---

१ पालखी. २ वृत्ति चळूं देऊ नकोस.

थोडे प्राप्त हो आणि फार चि ।
नको देऊं तूं हर्षशोकासि थारा ।
महादुःख सौख्यादि सोसीत जा हे ।
सदासर्वदा वृत्ति संतोष राहे ॥ ४३ ॥

समान चि शत्रू आणि मित्र बंधू ।
समान चि हारकारों जाणि बंधू ।
सहिष्णूपणें हा विवेको बरा हे ।
सदासर्वदा वृत्ति संतोष राहे ॥ ४४ ॥

महादुष्ट ही वासना त्याग बापा ।
इच्छ्यानि गुणें कोटि संसार खेपा ।
मला दे मला दे दुराशा नको हे ।
सदासर्वदा वृत्ति संतोष राहे ॥ ४५ ॥

---

१ दूत ?

उदासीनता सार ही साधनासी ।
निरापेक्षता सार ही या जनासी ।
निराशापुढें लक्षिम ही तिष्टताहे[1] ।
सदासर्वदा वृत्ति संतोष राहे ॥ ४६ ॥

अगा विश्वि या पहा विश्वंभराते ।
असे विश्व हे व्याप्य त्या व्यापकाते ।
कुबुद्धि नको त्याग या मीपणासी ।
नको पाहु लोकाचिया दुर्गुणाशी ॥ ४७ ॥

नको मुंगीचे चित्त दुखित ताता ।
तेथें आत्मयाचा तूं होसिल हंता ।
अंणु रेणु तूं पाहे त्या चिद्घनासी ।
नको पाहु लोकाचिया दुर्गुणाशी ॥ ४८ ॥

---

१ न मागे तयाची रमा होय दासी.

अगा पाप हे पाहता या जनाचे ।
जडे पाप ते आपणा दुर्जनाचे ।
म्हणोनि सदा पाहे बा सद्गुणासी ।
नको पाहु लोकांचिया दुर्गुणाशी ॥ ४९ ॥

ज्याचे पाप ते खाय त्यासि च बापा ।
डोळे झाक बोलु नको कांहि आपां[1] ।
न लागे तुला डाग रे सज्जनासी ।
नको पाहु लोकांचिया दुर्गुणाशी ॥ ५० ॥

सदा निर्मळा वृत्ति तुझी असुं दे ।
सदा स्वजळीं[2] दिव्य कीर्ति वसुं दे ।
दुरावृत्तिने पावसी यातनासी ।
नको पाहु लोकांचिया दुर्गुणाशी ॥ ५१ ॥

---

१ आपण, स्वतः? २ सोज्वळ, शुभ्र.

नको दोष पाहूं तुझा नाश होतो ।
नको दोष गाऊं कलि पाश देतो ।
अधःपात दे दोष हा तत्क्षगामी ।
नको पाहु लोकाचिया दुर्गुणाशी ॥ ५२ ॥

पहाता चि दोषासि तूं दोषि होसी ।
पुढीला जनाचे तूं का पाप घेसी ।
असोनि तुला दिव्य डोळा मनासी ।
नको पाहु लोकाचिया दुर्गुणाशी ॥ ५३ ॥

असे लोक हा सर्व विष्णु चिं सारा ।
गुणा आणि दोषासि देतु न थारा ।
नको अंगिकारू कधीं दुर्मनासी ।
नको पाहु लोकाचिया दुर्गुणाशी ॥ ५४ ॥

---

१ दुसरे.

तुळेना चि वैराग्यभाग्यासि काहीं ।
असे शुद्ध वैराग्य हें सार पाहीं ।
करी सद्विवेकासि जे नित्य साहे[1] ।
मुमुक्षासि वैराग्य हें भाग्य आहे ॥ ५५ ॥

न मूर्खासी कांहीं च वैराग्य गोडी ।
कुटुंबी जनासी असे जीत धाडी ।
रजोगुणी प्राण्यासी हे वीष पाहे ।
मुमुक्षासि वैराग्य हें भाग्य आहे ॥ ५६ ॥

असे स्त्रैण जो त्यासि वैराग्य नाहीं ।
अमुक्तासि वैराग्य हें दुःख पाहि ।
कुयोगी खळासी वैराग्य नोहे ।
मुमुक्षासि वैराग्य हें भाग्य आहे ॥ ५७ ॥

---

१ साह्य. विवेकवैराग्य हे वसंतकामाप्रमाणें एकमेकांचे साह्यकारी आहेत.

धनांधासि वैराग्य कांहीं रुचेना ।
मदांधासि वैराग्य कांहीं सुचेना ।
विरक्ति अतिमूढ तो हि न लाहे ।
मुमुक्षासि वैराग्य हें भाग्य आहे ॥ ५८ ॥

त्रितापे जळाला असे जो किं प्राणी ।
तयासी च वैराग्य हे गोड मानी ।
अनुताप त्यासीच त्या सौख्यदाहे[1] ।
मुमुक्षासि वैराग्य हें भाग्य आहे ॥ ५९ ॥

जयासीच संसारि धक्के चपेटे ।
प्रपंची जया पाह हे चित्त विटे ।
मनें घेतला त्रास ज्या दृश्यदाहे[2] ।
मुमुक्षासि वैराग्य हें भाग्य आहे ॥ ६० ॥

---

१ सौख्यद+आहे. २ दृश्य हें दाहरूप आहे.

स्त्रियेचा असे दास त्या त्रास नाहीं ।
बुडे रौरवाच्या महाघोर डोहीं ।
महापाप[2] यासि सुटेनाचि गेहे ।
मुमुक्षासि वैराग्य हें भाग्य आहे ॥ ६१ ॥

सडे या प्रपंचि महा मूर्ख जोगी ।
झडे या कुटुंबि मतिमूढ तो की ।
बुडे दुर्जना हात जोडूनि राहे ।
मुमुक्षासि वैराग्य हें भाग्य आहे ॥ ६२ ॥

मिळे दैवयोगें चि ते तूं स्विकारी ।
न हो दुर्ज्जनाच्या पुढें तूं भिकारी ।
समाधान हा मार्ग तूझा दिसूं दे ।
अयाचीत हे वृत्ति तूझी असूं दे ॥ ६३ ॥

---

१ वैराग्य. २ महापापी.

घरा आणुनी जे दिल्हे ते न त्यागी ।
नसे तो प्रतिग्रहो होतु विरागी ।
तयाच्या डोहामाजि चिंता फसुं दे ।
अयाचीत हे वृत्ति तूझी असूं दे ॥ ६४ ॥

‘मला दे’ महत्वासि हे होय हानी ।
‘मला दे’ स्वरूपासि ये ग्लानि मानी ।
सदा ऊर्ध ब्रह्मांडि दृष्टि धसूं दे ।
अयाचीत हे वृत्ति तूझी असूं दे ॥ ६५ ॥

तुझें धैर्य कल्याणि सोडूं नको तूं[1] ।
धना अंतवंता नको दूसळूं[2] तूं ।
उदासी सदा दैन्य वाणी नसूं दे ।
अयाचीत हे वृत्ति तूझी असूं दे ॥ ६६ ॥

---

१ संपत्तौ च विपत्तौ च महतां एकरूपता. २ उसळूं ?

हरीच्या वरी घाल तूं भार सारा ।
उणे ना पडूं दे चि तो सर्वसारा ।
कसोटी सोहं चित्त तुझे कसुं दे[1] ।
अयाचित हे वृत्ति तूझी असूं दे ॥ ६७ ॥

हरि स्थावरा जंगमा पाळिता हे ।
तुझ्या एक जीवासि का त्यागिताहे ।
हरीच्या पदीं निश्चयातें वसुं दे ।
अयाचित हे वृत्ति तूझी असूं दे ॥ ६८ ॥

असे लक्ष्मिचा स्वामि श्रीकृष्ण मूर्ति ।
निधि आणि सिद्धि सदा दासि होति ।
स्वरूपीं अशा चित्त तूझें ठसू दे ।
अयाचित हे वृत्ति तूझी असूं दे ॥ ६९ ॥

---

१ सोहं हीच एक कसोटी. तिच्यावर तुझे चित्तास कस लागूं दे ह्मणजे सोहं हा जप सारखा कर.

जळीं त्या स्थळीं स्वर्ग मृत्य लोकीं ।
हरि रक्षितो चार खाणीं[1] विलोकीं ।
अणूं मात्र गा धैर्य ना तूं खचूं दे ।
अयाचित हे वृत्ति तूझी असूं दे ॥ ७० ॥

असूरि सदा संपदा दुःखकारि ।
असे दैवि हि संपदा सौख्य भारी[2] ।
अधर्मासि त्यागी स्वधर्मासि राखी ।
तिन्हीं लोकीं या सद्गुणें वंद्य होसी ॥ ७१ ॥

बरा गूण तो दृढ चित्तीं धरावा ।
सदा त्याग तो दुर्गुणाचा करावा ।
सदा दक्ष हो सांडुनी आळसासी ।
तिन्हीं लोकीं या सद्गुणें वंद्य होसी ॥ ७२ ॥

---

१ स्वेदज, जारज, अंडज व उद्भिज या चार खाणी.
२ दैवी संपद्विमोक्षाय निबंधायासुरीमता.

असे अंतरीं वक्र त्या वक्र[१] श्रिष्टी ।
सदा मानसी गोड तो नोहे कष्टी ।
हरी रक्षितो सर्वदा भाविकासी ।
तिन्हीं लोकीं या सद्गुणें वंद्य होसी ॥ ७३ ॥

सदाचारि तूं स्वच्छ वृत्ति असूं दे ।
शरीरासि वस्त्रे मलीनें नसूं दे ।
कदापी पडूं तूं नको भ्रांति पाशीं ।
तिन्हीं लोकीं या सद्गुणें वंद्य होसी ॥ ७४ ॥

असूं तूं नको आळसी वा कदापि ।
सुबुद्धी प्रेत्नासि हो तूं प्रतापि[२] ।
दिवा रात्र ख्याति जगीं हो निराशी[२] ।
तिन्ही लोकीं या सद्गुणें वंद्य होसी ॥ ७५ ॥

---

१ आंधळ्यासीं जन सारे चि आंधळे. २ कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाच न.

न तूं अन्न संस्कारिकाचें स्विकारी ।
न त्या अन्नसत्राचिया जाउ द्वारीं ।
न प्राशि कदा पोहेघ्यों[1] जीवनाशी ।
तिन्ही लोकीं या सद्गुणें वंद्य होसी ॥ ७६ ॥

अणूमात्र हा लोक दुःखी करीना ।
जनाचेनि योगे कधीं दुःख हो ना ।
प्रतिग्रह दानासि त्यागी मनासी ।
तिन्ही लोकीं या सद्गुणें वंद्य होसी ॥ ७७ ॥

उठोनिया ब्राह्ममुहूर्ति सुपुत्रा ।
विधि शौच वेदोक्त कीजे सुगात्रा[2] ।
स्त्रियेचा कसा दास होसी कनिष्टा ।
वरा स्नान संध्या करी येक निष्ठा ॥ ७८ ॥

---

१ पाणपोई. २ गात्रांस 'सु' शुचि करावेंस.

बहिर्ग्रामें त्या दूर जावें दिशेसी ।
करी निंब त्या जांबळा दातोनासी ।
शुचिर्भूत होतां चि वाढे प्रतिष्ठा ।
बरी स्नान संध्या करी एक निष्ठा ॥ ७९ ॥

गवाळें चवाळें करी गोमुखीसि ।
बरी उपपात्रे हरीमंदिरासी ।
फुलें मंजुऱ्या चंदना दिव्य काष्ठा ।
बरी स्नान संध्या करी एक निष्ठा ॥ ८० ॥

करी ब्रह्मयज्ञादि तूं पंचयज्ञा ।
अनाचारि होऊं नको तात सूज्ञा ।
देव्हारा बरा दिव्यमूर्ति वरिष्ठा ।
बरी स्नान संध्या करी एक निष्ठा ॥ ८१ ॥

---

१ गांवाबाहेर २ दंतधावन, दांतवण. ३ येथपासून ८४ पावेतो श्लोक वाचून समर्थांच्या शिकवणीची आठवण होते.

जयंति हरीची कथा माजवावी ।
मठादीक संस्थान गुंफा करावी ।
महोत्साह यात्रा बरा थाट सिष्ठा ।
बरी स्नान संध्या करी एक निष्ठा ॥ ८२ ॥

महाज्ञानि योगी विवेकी तपस्वी ।
अशी ख्याति सत्कीर्ति अद्भूत व्हावी ।
अहाहा असे धन्य हा माजि श्रेष्ठा ।
बरी स्नान संध्या करी एक निष्ठा ॥ ८३ ॥

असू दे तुझी मुख्य बुद्धी विशाळा ।
हरीची करी देउळें दिव्य शाळा ।
किती दुःखी संसारी होसी कनिष्ठा ।
बरी स्नान संध्या करी एक निष्ठा ॥ ८४ ॥

स्थिति पाहुनि लक्षशा शिष्य होती ।
रमा सर्वदा दासि होईल शांति ।
हरीभक्तिविन्मूख कां होसि नष्टा ।
बरी स्नान संध्या करी एक निष्ठा ॥ ८५ ॥

जया अंतरीं नाहि हा दुष्ट काम ।
तो चि सर्वदा पूर्ण निष्काम राम ।
हरी शंभु ब्रह्मा तिन्ही देव राजी ।
त्यजी काम हा क्रोध हा लोभ पाजी ॥ ८६ ॥

तिन्ही द्वार विख्यात हे रौरवाचे ।
महायातनादायके हे भवाचे ।
तिघासी जिवे मारितो मर्द गाजी ।
त्यजी काम हा क्रोध हा लोभ पाजी ॥ ८७ ॥

---

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।

रिपू हे चि आहेत सर्वा जनांचे ।
सदा सर्वदा मैत्र हे दुर्जनांचे ।
धरी अंतरीं संपदा दैविका जो ।
त्यजी काम हा क्रोध हा लोभ पाजी ॥ ८८ ॥

सोऽहं शुद्ध हा काम चित्तिं असूं दे ।
असूरी कोऽहं भाव घाती नसूं दे ।
जया वीजयाची सदा जीकं बाजी ।
त्यजी काम हा क्रोध हा लोभ पाजी ॥ ८९ ॥

करीना च तूं काम्य कर्में कदापि ।
अनुष्टान कामिक तन्मूलकापि ।
अति क्रोधि यासी मिळेना चि भाजि ।
त्यजी काम हा क्रोध हा लोभ पाजी ॥ ९० ॥

---

१ सात्विक काम म्हणजे वासना असावी. २ जय.

रंजो गूण जेथें तेथें काम आहे ।
तमोगूण जेथें तेथें क्रोध पाहे ।
असे दुर्गुणाचा निधि लोभ दोंजी ।
त्यजी काम हा क्रोध हा लोभ पाजी ॥ ९१ ॥

असे क्रोध जो तो जळे दीनराती ।
अति क्रोधिया देखतां लोक भीति ।
महा क्रोधि या ना ह्मणे कोण्ही या जी ।
त्यजी काम हा क्रोध हा लोभ पाजी ॥ ९२ ॥

नसे सौख्य बा आत्मविद्या समाना ।
असे ज्यासि विद्या नसे त्यासी म्लाना ।
असो प्राकृता संस्कृता राग रंगी ।
जगीं धन्य विद्वान आहे विरागी ॥ ९३ ॥

---

राजस वासना त्याज्य आहे. २ संबोधनार्थ.

असे रूप हे सर्व विद्या[1] नरासी ।
सदा गुप्त द्रव्य न चोर यासी ।
सुविद्यागुणें या जगीं थोर योगीं ।
जगीं धन्य विद्वान आहे विरागी ॥ ९४ ॥

सदा देत विद्या नरा भोग नाना ।
महा सौख्य सत्कीर्ति बुद्धि समाना ।
गुरु चा × थोर विद्या सुसंगी ।
जगीं धन्य विद्वान आहे विरागी ॥ ९५ ॥

असे बंधु ही पूर्ण विद्या विदेशी ।
परा देवता हि सुविद्या जनासी ।
अविद्यागुणें हा नको वाद जंगी ।
जगीं धन्य विद्वान आहे विरागी ॥ ९६ ॥

---

१ विद्या नाम नरस्य रूपमधिकं । इत्यादि.

असे पूज्य हे राजद्वारीं सुविद्या ।
महा रौरवाते च दे ही अविद्या ।
तिन्ही लोक माजि करिना विरंगी ।
जगीं धन्य विद्वान आहे विरागी ॥ ९७ ॥

अहोरात्र ( मा ना ) डी सुविद्या असावी ।
नळी गुर्गुडी भांग गांजा नसावी ।
सुविद्यो[1] विना व्यसना फार त्यागी
जगीं धन्य विद्वान आहे विरागी ॥ ९८ ॥

नको गंजीफा बुद्बळादिक बाजी ।
नको सोंगटि चावटी व्यर्थ बाजी ।
कदापी नको होऊं बा तूं कुयोगी ।
जगीं धन्य विद्वान आहे विरागी ॥ ९९ ॥

---

१ विद्यायां व्यसनम् ।

अति नम्रता वाणि ही अमृताते ।
सदा विश्वीं तूं पाहे विश्वंभराते ।
नको तूं उभा राहूं प्राणी कुसंगी ।
जगीं धन्य विद्वान आहे विरागी ।। १०० ।।

शताधीक हे सप्त वैराग्यमाळा ।
गुणा सद्विवेकासि आहे उमाळा ।
वदे मार्ग सोपा कवीनाथ स्वामी ।
येणे चि गुणें वर्णि नाथस्वामी ।। १०१ ।।

इति श्री मत्परमहंस नाथस्वामी विरचितम्